PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 6

# नाथ संप्रदाय

**रूपा गजानन बसोले**

**रिसर्च स्कॉलर**

**मराठी विभाग**

**आर्टस् कॉलेज उस्मानिया युनिव्हर्सिटी**

**हैद्राबाद तेलंगाना**

## प्रस्तावनाः

दहावे-अकरावे शतकाचा हा कालखंड भारताच्या राजकीय व सामाजिक जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. भारताची अध्यात्मिक विचार परंपरा या काळात प्रत्यक्ष आत्मिक साक्षात्काराने कृतार्थ बनली होती. हिमालयापासून रामेश्वरपर्यंत या काळात भारतात आत्मानुभूतीचा ध्वनी हुंकारत होता. भारताच्या सांस्कृतिक परंपरेत मध्ययुगीन भारतीय साधना हा सुवर्णकाळ होता. गुरू गोरक्षनाथांनी प्रथमच या युगाचे प्रवर्तन अखिल भारतीय पातळीवरून केले आणि नाथ संप्रदायाची स्थापना केली. मध्ययुगीन भारतीय साधनेची गंगोत्री समजल्या जाणाऱ्या नाथ संप्रदायाने समकालीन सर्व साधन पृणालीचा सुयोग्य समन्वय साधून मध्ययुगीन विशुद्ध साधना पृणालींना भारतव्यापी प्रवाहात पृवर्तित केले. भारतभर पसरलेल्या नाथ संप्रदायाचे स्थान महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने अनन्य साधारण आहे. नाथ संप्रदायाचा उदय-विकास महाराष्ट्रातील महानुभाव, वारकरी, आनंद व समर्थ साधना संप्रदायापूर्वी घडून आला आणि कमी-अधिक प्रमाणात त्याचा ठसा या सर्व संप्रदायावर उमटला.

## विश्लेषणः

**नाथ संप्रदायाच्या उगमाची पार्श्वभूमीः** नाथ संप्रदायाचा उदय सुमारे दहाव्या-अकराव्या शतकात झाला. या शतकात उत्तर भारतात महमूद गझनीच्या अधिपत्याखाली मुसलमानांचे विध्वंसक आक्रमण चालू होते. आक्रमक विजेते म्हणून उत्तर भारतात प्रकट होऊ लागलेले इस्लामचे राजकीय स्वरूप भयावह होते. याच काळात मध्ययुगीन साधनेने एक निराळे रूप धारण केले होते. यात तांत्रिक साधनेला अनन्यसाधारण

महत्त्व प्राप्त होऊन तांत्रिक साधना सर्वत्र फोफावत होती. "हा काळ म्हणजे बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची अखेरची अवस्था. या काळात बौद्ध धर्माने तंत्रसाधना अंगिकारली आणि अनेक आचार्यांनी व साधकांनी तंत्राचे सुव्यवस्थित शस्त्रही बनवले."[१] असे रां. चिं. ढेरे म्हणतात. मध्ययुगीन काळाचे तांत्रिक साधना हे अनन्यसाधारण वैशिष्ट्य होय. याच सुमारास हिंदू साधना पृणालीत या तंत्रसाधनेचा अतिरेक झाला आणि भारतात लवकरच बौद्ध, शाक्त, कापालिक इ. तंत्रसाधनेचे प्राबल्य माजले. या काळात योग मार्गालाही अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते परंतु तो तांत्रिकाच्या कचाट्यात सापडल्यामुळे त्याचे अधःपतन होऊ लागले होते. या पद्धतीच्या यौगिक पृक्रियेसाठी स्त्री हे अत्यावश्यक साधन बनले होते. तांत्रिक साधना येथवर थांबली नाही तर या काळात शतकापासून बहरत राहिलेल्या तंत्रसाधनांनी वेदांविरूद्ध जोरदार आवाज उठविला. वैदिक परंपरेतील परमार्थ साधनेला ज्या गोष्टी निषिद्ध होत्या त्या सर्व गोष्टी तांत्रिक साधनेत अत्यावश्यक बनल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर आणि श्री शैल्य आणि त्याच्या आजूबाजूच्या परिसरात मद्य, मांस, स्त्री-प्रधान साधनाचा जोर वाढला होता. "या आणि इतर तत्कालीन दृढ साधनाप्रणालीत योग, उपास्य 'शिव', वेदविरोधी स्वर, बाह्याचाराला विरोध, देह देवालय इ. साधारण वैशिष्ट्य होती. गोरक्षनाथाने याच पार्श्वभूमीवर योग आदि वैशिष्ट्यांचा समन्वय दृष्टीने स्वीकार करून आणि विषय प्राधान्याचा धुव्वा उडवून योग प्रधान, 'शिव'-युक्त, अनुभूतींना प्रमाण मानणारा, बाह्याचार – विरोधक असा 'नाथ संप्रदाय' प्रवर्तित केला."[२] असे रा. चिं. ढेरे म्हणतात.

**नाथ संप्रदायाचा उदय आणि विस्तारः** नाथ संप्रदायाचा उदय केंव्हा आणि कोठे झाला याविषयी अभ्यासकांत अनेक मते आहेत. आदिनाथ परमतत्त्व आणि पार्वती आद्यशक्ती आहे. त्यांच्याकडून मत्स्येंद्रनाथांना उपदेश प्राप्त झाला. मत्स्येंद्रनाथांकडून गोरक्षनाथांना नाथ संप्रदायाचे प्रवर्तक म्हणून गौरविलेले आढळते. "दहाव्या शतकापर्यंत विकृतावस्थेत गेलेल्या तांत्रिक वामाचारी उपासनेला पायबंद घातला आणि शुद्ध योग मार्गाच्या पायावर एका नवीन परंपरेची प्रस्थापना केली. ती करीत असताना त्यांनी सर्वप्रथम श्री शैल्य पर्वतावर योगिनीच्या मेळाव्यात सापडलेल्या आपल्या गुरूचे मन वळवून त्यांना पुन्हा शुद्ध योग मार्गात आणले. हाच या नाथ संप्रदायाचा आरंभ बिंदू किंवा उगम होय."[३] असे र. रा. गोसावी म्हणतात.

नाथ संप्रदायाचा विस्तार हा भारताबाहेरील अनेक देहात ही झाला व तेथे प्रभाव गाजविलेला आहे. भारतातील उत्तरे प्रमाणेच दक्षिणेतही या संप्रदायाचा प्रभाव दिसून येतो. नाथ संप्रदायाच्या सांप्रदायिक ग्रंथात नाथ संप्रदायाचे विविध नावे आढळून येतात. नाथ पंथ वा नाथ संप्रदाय, अवधूतमत, योग संप्रदाय, योगमत, सिद्धमत, सिद्धपंथ, सिद्ध मार्ग, कानकाटे, दर्शनी, योगीमत, गोरखनाथी संप्रदाय, गोरखमत, गुरूमार्ग, अशी विविध नावे या संप्रदायाला आहेत तरी नाथ संप्रदाय हेच नाव सर्वमान्य व सर्वत्र दृढ आहे.

**संप्रदायाचे उपास्य देवताः** नाथ संप्रदाय हा शैव संप्रदाय असल्याने 'अदिनाथ शिव' या संप्रदायाचे अराध्य दैवत आहे. शिवाय शिवाची शक्ती पार्वती, त्यांची रूपे अंबा, जगदंबा, दुर्गा, त्रिपुरा इ. नाथांना पूजनीय आहे. 'दतात्रेय' हे गुरूसंस्थेचा आदर्श म्हणून त्यांना या संप्रदायात पूज्य स्थान आहे. त्याप्रमाणे 'नवनाथां'ना या संप्रदायात अनन्यसाधारण स्थान आहे.

**संप्रदायाचे प्रमाण ग्रंथः** "नाथ संप्रदायात सिद्धांत आणि साधना पद्धतीवर चर्चा करणारे अनेक ग्रंथ असून ते संस्कृत आणि हिंदी भाषेत लिहिलेले आहेत."[४] असे र. रा. गोसावी म्हणतात. 'सिद्धसिद्धांत पद्धती' ह्या ग्रंथास नाथ संप्रदायात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. या शिवाय प्रमाण ग्रंथ म्हणून 'सिद्धसिद्धांत संग्रह', 'गोरक्षसिद्धांत संग्रह', गोरक्षलिखित 'गोरक्षपद्धती' आणि 'हठ योग प्रदीपिका' संप्रदायात मान्यता पावलेले आहेत.

**सांप्रदायिकांचा वेश आणि आचारः** नाथ सांप्रदायिकांना त्यांच्या बाह्य वेशावरून सहज ओळखता येते. कर्णकुंडल, धंधारी, रूद्राक्षमाला, किंकरी, मेखला, जानवे, शृंगी, कंथा, दंडा, खापरी आणि आधारी हा त्यांचा बाह्य वेश. याशिवाय अंगाला विभूती लावणे, खांद्यावर व्याघ्रांबर घेणे, पायात पावरी घालणे आणि काखेत खापर घेणे अशी सर्व साधारण वेशभूषा नाथ संप्रदायिकांची होती.

नाथ संप्रदाय हा योग प्रधान संप्रदाय असल्यामुळे एका विशिष्ट आचाराला या संप्रदायात प्राधान्य दिले जाते. "योगसाधनेतील यश केवळ शरीरनिष्ठ नाही. त्याला शुद्ध आणि सात्विक मनाचे अधिष्ठान प्राप्त झाले. तरच मनाची एकाग्रता निर्माण होणार."[५] असे र रा. गोसावी म्हणतात. गोरक्षनाथांनी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, क्षमा, धृति, शौचादी दहा यम आणि दान, तप, पूजन सिद्धांतश्रवण इ. दहा नियम पाळण्यावर भर दिला आहे.

**तत्त्वज्ञानः** नाथ संप्रदायात शिक्तीयुक्त शिव यालाच अंतिम सत्य मानले आहे. ब्रम्हाण्डाला व्यापलेली ही शक्ती मानवी शरीरात कुंडलिनी रूपाने स्थित आहे आणि म्हणून नाथ संप्रदायातील साधक या शक्तीच्या उपासनेचे साधन पिंडालाच मानून, ही कुंडलिनी शक्ती जागृत करून, शिवशक्तीच्या समरसतेची सहज समाधी अनुभविणे हेच अंतिम ध्येय मानतात.

**प्रमुख नाथसिद्धः मत्स्येंद्रनाथ** – नाथ संप्रदायातील आदिसिद्ध पुरूष आदिनाथानंतर सर्वात महत्त्वाचे स्थान मत्स्येंद्रनाथांचे आहे. गोरक्षनाथांचे गुरू, माशाच्या रूपात महादेवांनी पार्वतीला सांगितलेले गृह्यज्ञान ऐकल्यावर महादेवांनी त्यांना मत्स्येंद्रनाथ बनवले. नाथ संप्रदायातील त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या नावावर कुलानंदतंत्रम, ज्ञानकारिका, कौलज्ञाननिर्णय आणि योगाविषय हे ग्रंथ आहेत.

**गोरक्षनाथ** – गोरक्षनाथ हे मत्स्येंद्रनाथांचे परम शिष्य आणि मध्ययुगीन भारत देशातील महान योगी व महान पुरूष. मध्ययुगीन भारतीय साधनेला प्राप्त झालेल्या विकृतावस्थेला गोरक्षनाथांनी पायबंद घालून शुद्ध योग मार्गाच्या पयावर एक नवीन परंपरेची प्रस्थापना केली. नाथ संप्रदायाचे प्रवर्तक गोरक्षनाथांनी संप्रदायाचा विस्तार आणि विकास भारतभर केला. गोरक्षनाथांची आपल्या गुरूप्रती भक्ती अपार होती. त्यांनी अनमस्क, सिद्धसिद्धांतपद्धती, गोरक्षपद्धती, गोरखबोध, सबदी, पद, अवधूत गीता, गोरक्षशास्त्र, गोरक्ष संहिता, हठयोग संहिता, ज्ञानशतक इ. संस्कृत व हिंदी ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत.

**जालंदरनाथ** – जालंदरनाथ मत्स्येंद्रनाथांचे गुरूबंधू. ते सर्व शास्त्रविद्या, शस्त्रविद्यात निपुण होते. आपल्या तपश्चर्येच्या आणि योग सामर्थ्याच्या बळावर अनेक चमत्कार घडवून आणले. भारतभर त्यांनी योग मार्गाचा व संप्रदायाच्या तत्त्वाचा प्रचार केला.

**कनिकनाथ** – जालंदरनाथांचे शिष्य कनिकनाथ हे थोर योगसिद्ध पुरूष म्हणून ओळखले जातात. संप्रदायात त्यांचे एक महत्त्वाचे स्थान आहे.

**गहिनीनाथ** – गोरक्षनाथांचे शिष्य आणि निवृत्तीनाथांचे गुरू. महाराष्ट्रात नाथ संप्रदायाची परंपरा रुजविणारे पहिले नाथसिद्ध होय. गहिनीनाथांनी महाराष्ट्रातील नाथ परंपरेला कृष्णभक्तीची जोड देऊन नाथ संप्रदायाला भक्ती संप्रदाय म्हणून ओळख दिली. 'गोरक्षणगीता' हा ग्रंथ त्यांच्या नावावर आहे.

**भर्तरीनाथ** – भर्तरीनाथांना गोरक्षनाथाकरवी दिक्षा प्राप्त होऊन त्यांचा समावेश नाथ संप्रदायात झाला. ते संस्कृत आणि साहित्याचे पंडित होते. त्यांनी नीतिशतक, शृंगारशतक व वैराग्यशतक असे त्रयशतक ग्रंथ रचले.

**रेवणनाथ** – रेवा नदीच्या तीरावर सापडले म्हणून त्यांचे नाव रेवण असे पडले. श्री दत्तात्रेयांनी संपूर्ण ज्ञान त्यांना सज्ञान केले. योगसिद्धीच्या जोरावर लोककल्याणाचे काम केले.

**श्री वटसिद्ध नागनाथ** – वडाच्या झाडाच्या ढोलीत एका सर्पिणीच्या पोटी जन्म झाल्यामुळे त्यांचे नाव वटसिद्ध नागनाथ असे पडले. त्यांनी आपल्या ज्ञानाचा, सिद्धीचा उपयोग जनकल्याणासाठी करून संप्रदायाचा प्रचार, प्रसार केला. शाबरी मंत्राच्या रचनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

**श्री चर्पटी नाथ** – श्री दत्तात्रेयाकडून संप्रदायाची दीक्षा प्राप्त केली. त्यांनी शाबरी मंत्राची रचना केली. नाथ संप्रदायाच्या तत्त्वाचे आचरण करून अनेकांना आत्मज्ञान दिले. अशा ह्या नवनाथांबद्दल आजही जनमानसात आदराचे स्थान आहे.

गुरूमार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ह्या संप्रदायात गुरूला खूप महत्त्व आहे. ह्या संप्रदायात गुरूचे स्थान परमदैवत आदिनाथांपेक्षाही श्रेष्ठ आहे. 'गुरू बिन राहिबा' हाच संदेश या संप्रदायातून मिळतो.

**संप्रदायाचे कार्य –** मध्ययुगीन भारतीय साधनेची गंगोत्री समजल्या जाणाऱ्या नाथ संप्रदायाचे कार्य उल्लेखनीय आहे. भारताच्या मध्ययुगीन कालखंडातील संप्रदायांना जे विकृत वळण प्राप्त झाले होते, त्या विकृतींना समूळ नष्ट करून विशुद्ध साधना प्रणाली परिवर्तित करण्याचे महान कार्य गोरक्षनाथांनी केले. "नाथ पंथाने आपल्या तत्त्वज्ञानच्या योगे आचारधर्मानुसार कैवल्यमुक्तीचे द्वार स्त्री शुद्रादिकांना खुले करून फार मोठी कामगिरी केली यात शंका नाही."[६] असे पं. रा. मोकाशी म्हणतात. या संप्रदायात देशी भाषेचा पुरस्कार करून संप्रदायाचे तत्त्वज्ञान बंगाली, हिंदी, मराठी इ. भाषेतून संप्रदायाचा प्रचार व वाङमयनिर्मिती केली. नाथ संप्रदायाने हिंदू व मुसलमान असा भेदभाव न ठेवता संप्रदायाच्या विशुद्ध भूमिकेशी समस्त होणाऱ्या मुसलमानांनाही संप्रदायात सामावून घेतले. "नाथ संप्रदायातील थोर विचारांचा, शुद्ध, नैतिक आचारांचा वारसा घेऊन भारतभर दया, क्षमा, शांती, बंधुभाव, समता ह्या उदात्त तत्त्वांच्या पायावर भक्तीचे महान मंदिर उभे करण्यात ज्ञानेश्वर – कबीरादी संतांना प्रेरणा मिळाली"[७] असे र रा. गोसावी म्हणतात.

**समारोपः**

नाथ संप्रदाय हा भारतीय शैव संप्रदाय म्हणून ओळखला जातो. आदिनाथ परमदैवत असलेल्या या संप्रदायात मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, इ. थोर संत होऊन गेले. ह्या सर्व संतांची संप्रदायातील कमगिरी उल्लेखनीय आहे. या संप्रदायात मंत्र, तंत्र, यंत्र आणि योग साधनेला अधिक महत्त्व आहे. योग साधनेचे मूळ स्त्रोत आदिनाथ शिव असल्यामुळे या संप्रदायाचा योग मार्ग हा अविभाज्य घटक आहे. दहाव्या शतकात योग साधनेला विकृतावस्था प्राप्त झाली होती तेंव्हा गोरक्षनाथांनी ह्या साधन प्रणालीला विशुद्ध साधना पद्धतीत परावर्तित करण्याचे महान कार्य केले. नवनाथांच्या कार्यातून नाथ संप्रदायाचा प्रचार व प्रसार भारतभर झाला. नाथ संप्रदायाचा ठसा कमी-अधिक प्रमाणात भारतातील इतर संप्रदायावर उमटला. कालांतराने संप्रदायचा प्रभाव व प्रसार झाला असला तरी नवनाथांच्या प्रती आजही जनमानसात आदरभाव आहे.

## संदर्भसूचीः

१. ढेरे रा. चिं., 'नाथ संप्रदायचा इतिहास', पद्मगंधा प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पृष्ठ क्र. १७.

२. तत्रैव, पृष्ठ क्र. १८.

३. गोसावी र. रा., ‘पाच भक्तिसंप्रदाय’, प्रतिमा प्रकशन, तृतीय आवृत्ती, पृ. क्र. २८.

४. तत्रैव, पृष्ठ. क्र. ३२, ३३.

५. गोसावी र रा., ‘पाच भक्तिसंप्रदाय’, प्रतिमा प्रकशन, तृतीय आवृत्ती, पृ. क्र. ४४.

६. मोकाशी पं. रा. ‘महाराष्ट्रातीय पाच संप्रदाय’, पृ. क्र. ३२.

७. गोसावी र. रा., ‘पाच भक्तिसंप्रदाय’, प्रतिमा प्रकशन, तृतीय आवृत्ती, पृ. क्र. ९२.